# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.05.2026** **वारः मंगळवार**

---

1. पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये विधानसभा निवडणुकीत भाजपला प्रचंड बहुमत, तमिळनाडूमध्ये टीव्हीकेची पदार्पणातच चांगली कामगिरी
2. केरळम् मध्ये काँग्रेसप्रणित यू डी एफचा विजय, तर, पुदूच्चेरीमध्ये स्थानिक ए आय एन आर सी ला सर्वाधिक जागा
3. रशिया यूक्रेन युद्धसंघर्षात रशियाकडून 8 आणि 9 मे रोजी युद्धविरामाची घोषणा
4. संयुक्त अरब अमिरातीच्या फुजैरा तेल उद्योग क्षेत्रात इराणकडून ड्रोन हल्ला आणि
5. देशाच्या विविध भागांमध्ये आज मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**निवडणूक निकाल**

पश्चिम बंगाल, केरळम्, तमिळनाडू, आसाम आणि केंद्रशासित प्रदेश पुदुच्चेरीमध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांचे निकाल हाती आले आहेत.

पश्चिम बंगालमध्ये, भाजपनं प्रचंड बहुमत मिळवून इतिहास घडवला आहे. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणानंतर होणाऱ्या पहिल्याच निवडणुकीत, 15 वर्षे सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला पराभव पत्करावा लागला आहे.

पश्चिम बंगाल मध्ये भाजपने 206 जागा जिंकत, निर्णायक बहुमत मिळवलं आहे, तर तृणमूल काँग्रेसने 80 जागा जिंकल्या आहेत. या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला केवळ 2 जागांवर समाधान मानावं लागलं तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला एका जागेवर विजय मिळाला. तृणमूल कॉंग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला. भबानिपूर मतदारसंघात, तृणमूल कॉंग्रेसच्या पक्षाध्यक्षा ममता बॅनर्जी यांचा, भाजपाचे उमेदवार सुवेंदू अधिकारी यांनी सुमारे 15 हजार मतांनी पराभव केला.

**पश्चिम बंगाल**

दरम्यान, निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमअधल्या फलता मतदारसंघात 21 मे ला फेरमतदान आणि 24 तारखेला मतमोजणी घेण्याचे आदेश दिले आहेत.

आसाममधे मतदारांनी भारतीय जनता पक्षावर पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. आसाममधे भाजपाने 82 जागा जिंकल्या असून मित्रपक्ष आसाम गण परिषदेनं 10 जागा तर, बोडोलँड पीपल्स फ्रंटनं देखील 10 जागा मिळवल्या आहेत. काँग्रेस पक्षाला 19 जागांवर विजय मिळाला असून, ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटनं 2 जागा जिंकल्या आहेत. भाजप नेते आणि विद्यमान मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी जलुकबारी मतदारसंघातून काँग्रेसच्या प्रतिस्पर्धी बिदिशा निओग यांचा पराभव केला आहे.

तमिळनाडूमध्ये, अभिनेते विजय यांच्या टीव्हीके पक्षाला पदार्पणातच भरघोस मताधिक्य मिळालं आहे. टीव्हीकेने राज्यातील 234 मतदारसंघांपैकी 108 जागा जिंकल्या आहेत. द्रविड मून्नेत्र कळगम अर्थात डी एम के पक्षाला 59 जागा मिळाल्या असून, ए डी एम के पक्षाला 47 जागांवर विजय मिळाला आहे. कॉंग्रेस पक्षाला केवळ 5 जागांवर विजय मिळाला आहे. दरम्यान, केरळचे विद्यमान मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी त्यांचा राजीनामा राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांच्याकडे सुपूर्द केला. नवीन सरकारचा शपथविधी होईपर्यंत विजयन यांनी काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम करावं अशी विनंती राज्यपालांनी त्यांना केली आहे.

पुदुचेरीमध्ये, 30 पैकी 18 जागांवर राष्ट्रीय लोकशाही आघाडीला भरघोस बहुमत मिळालं आहे. एनडीएच्या घटक पक्षांपैकी, ऑल इंडिया एनआर कॉंग्रेसने 12 जागा, तर भारतीय जनता पक्षानं 4 जागा जिंकल्या आहेत. इतर मित्रपक्ष ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम आणि लच्छिया जननायगा कची यांनी प्रत्येकी एक जागा जिंकली आहे.

केरळमध्ये, संयुक्त लोकशाही आघाडीनं 102 जागा जिंकून सत्तेत निर्णायक पुनरागमनाचे संकेत दिले आहेत.

**<u>बारामती-सुनेत्रा पवार</u>**

महाराष्ट्रात बारामती विधानसभा जागेच्या पोटनिवडणुकीत उप-मुख्यमंत्री सुनेत्रा पवार 2 लाख 18 हजार 969 मतांनी विजयी झाल्या आहेत.

**<u>अहिल्यानगर</u>**

तसंच राज्यातल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले विजयी झाले असून त्यांनी 1 लाख 38 हजार 929 मतांनी विजय मिळविला.

**<u>पंतप्रधान मोदी</u>**

विधानसभा निवडणुकांमधला भाजपचा विजय हा 'ऐतिहासिक आणि अभूतपूर्व' असल्यासांगत पश्चिम बंगाल, आसाम, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि केरळमधील जनता तसंच पक्ष कार्यकर्त्यांप्रती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. ते काल संध्याकाळी दिल्लीतील भाजप मुख्यालयात निवडणूक निकालानंतर पक्ष कार्यकर्त्यांना संबोधित करताना बोलत होते, मतदानाची विक्रमी नोंद झाल्याचे नमूद करत, निवडणुकांचे सुरळीत आयोजन केल्याबद्दल भारताच्या निवडणूक आयोगाचे, आयोगाच्या अधिकाऱ्यांचे, मतदान कर्मचाऱ्यांचे आणि सुरक्षा दलांचे पंतप्रधानांनी अभिनंदन केलं आहे.

**<u>अमित शहा</u>**

बंगालमधला भाजपचा हा ऐतिहासिक विजय हा पक्षाच्या असंख्य कार्यकर्त्यांचा त्याग, संघर्ष आणि हौतात्म्याचा परिणाम आहे, असं गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे.

**<u>प्रतिक्रिया</u>**

पश्चिम बंगालमधील विजय हा केवळ एका राज्यापुरता मर्यादित नसून देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित मोठा विजय असल्याचं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. देशात होणारी घुसखोरी, दहशतवादी कारवाया आणि हल्ल्यांपासून देशाला सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने हा विजय महत्त्वाचा असल्याचं त्यांनी नमूद केलं. हा विजय देशातील प्रत्येक नागरिकाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असलेल्या विश्वासाचा असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**राहुल गांधी**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी विधानसभा निवडणुकीत अत्यंत निर्णायक जनादेश दिल्याबद्दल केरळच्या जनतेचे आभार मानले आहेत. समाजमध्यमावरील संदेशात राहुल गांधी यांनी UDF च्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे, त्यांनी अत्यंत चिकाटीने लढवलेल्या आणि उत्तम प्रकारे राबवलेल्या प्रचार मोहिमेबद्दल अभिनंदन केलं आहे.

**रशिया**

दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीचा पराभव केल्याच्या 81 व्या वर्षानिमित्त, रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं येत्या 8 आणि 9 मे रोजी विजय दिनानिमित्त युक्रेनमध्ये युद्धविरामाची घोषणा केली आहे. मात्र युक्रेननं या विजय दिनाच्या सोहळ्यात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला, तर ते प्रत्युत्तर देतील,असा इशाराही रशियानं दिला आहे. यंदाच्या विजय दिन सोहळ्यानिमित्त आयोजित लष्करी संचलनामध्ये सुरक्षेच्या कारणास्तव रणगाडे, क्षेपणास्त्रे आणि इतर अवजड उपकरणांचा समावेश करण्यात येणार नाही.

**इराणचा हल्ला**

पश्चिम आशियातल्या युद्ध संघर्षाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त अरब अमिरातीच्या फुजैरा तेल उद्योग क्षेत्रात इराणमधून झालेल्या ड्रोन हल्ल्यानंतर काल मोठी आग लागली. गेल्या महिन्यात शस्त्रसंधी लागू झाल्यापासून संयुक्त अरब अमिरातीच्या भूमीवर लक्षणीय नुकसान करणारा हा पहिलाच हल्ला आहे. आग विझवण्यासाठी नागरी संरक्षण पथकं तात्काळ तैनात करण्यात आली. या हल्ल्यात तीन भारतीय नागरिक किरकोळ जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.फुजैरा हे एक बंदर शहर असून, सामुद्रधुनीचा वापर न करता तेल निर्यात करण्याच्या संयुक्त अरब अमिरातीच्या क्षमतेसाठी ते अत्यंत महत्त्वाचं आहे.

**डॉ.एस.जयशंकर**

भारत आणि जमैका हीहे दोन्ही देश भौगोलिकदृष्ट्या दूर असले तरी ते एकमेकांच्या जवळ आहेत आणि 'ग्लोबल साउथ'मधील अभिमानास्पद अशी विकसनशील राष्ट्रे आहेत, असं मत परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांनी व्यक्त केलं. ते काल जमैकामधील सबिना पार्क क्रिकेट स्टेडियमवर नवीन डिजिटल स्कोअरबोर्डच्या अनावरणप्रसंगी बोलत होते. भारत आनंदोत्सवाच्या, खेळाच्या आणि कठीण प्रसंगीदेखील जमैकाच्या पाठीशी उभा राहिला आहे,असंही जयशंकर यावेळी म्हणाले.

**रस्ते आढावा-गडकरी**

महाराष्ट्रातल्या विविध महत्त्वपूर्ण महामार्ग विकास प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी राज्यातील पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यासाठी सुरू असलेल्या आणि प्रस्तावित कॉरिडॉर प्रकल्पांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. महाराष्ट्रातील रस्ते संपर्क अधिक सक्षम करणं, लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढवणं आणि प्रादेशिक आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी प्रकल्पांच्या नियोजन आणि अंमलबजावणी प्रक्रियेला गती देणं या उद्देशानं ही आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

**<u>शेअर</u>**

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांकात वाढ होऊन काल 77 हजार 269 अंकांवर बंद झाला, तर निफ्टी 122 अंकांनी वाढून 24 हजार 119 अंकांवर स्थिरावला. राष्ट्रीय शेअर बाजारावरील व्यापक बाजारपेठही सकारात्मक पातळीवर बंद झाली. तत्पूर्वी, जागतिक बाजारातील सकारात्मक संकेत आणि विधानसभा निवडणुकांचे सुरुवातीचे कल यामुळं बाजाराची सुरुवात तेजीनं झाली होती. मात्र सत्राच्या उत्तरार्धात झालेल्या नफा-वसुलीमुळंनिर्देशांकांनी आपली सुरुवातीची वाढ गमावली आणि अखेरीस बाजार मध्यम स्वरूपाच्या सकारात्मक पातळीवर बंद झाला.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं देशाच्या विविध भागांमध्ये आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश, झारखंड, ओडिशा, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल, सिक्कीम, तसंच तामिळनाडू आणि पुद्दुचेरी या भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, बिहार, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश आणि गांगेय पश्चिम बंगालच्या काही भागांमध्ये आज दिवसभरात मेघगर्जनेसह विजा चमकण्याचीही शक्यता आहे. तर दुसरीकडं, आंध्र प्रदेशच्या काही भागांमध्ये आज उष्ण आणि दमट हवामान कायम राहण्याची अपेक्षा आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार